# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२६

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

## राज्यातील शिक्षण संस्थांमधील मुख्याध्यापकांचे वेतन निश्चिती आणि नियुक्ती करण्याचे अधिकार शिक्षणाधिकारी यांना देण्याबाबत

**(१) १५८ (२२-०४-२०२५) श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वाद असलेल्या शिक्षण संस्थांमध्ये मुख्याध्यापकांची वेतन निश्चिती, वेतनवाढ, वरिष्ठ वेतनश्रेणी व निवडश्रेणी व इतर प्रकरणांबाबत निर्णय घेण्याचा अधिकार शिक्षणाधिकारी यांना प्रदान करण्याबाबतचा निर्णय शासनाने दिनांक २७ फेब्रुवारी, २०२३ रोजी घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक वाद असलेल्या शिक्षण संस्थांमधील चेंज रिपोर्ट संबंधित धर्मादाय आयुक्तांच्या कार्यालयात वर्षानुवर्षे प्रलंबित असल्यामुळे अधिकृत कार्यकारी मंडळ कार्यरत नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संस्थांमध्ये प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व मुख्याध्यापक यांचा समावेश करून त्यांना वरिष्ठ निवडश्रेणी, वैद्यकीय प्रतिपुर्ती लागू करणे व सेवा जेष्ठतेनुसार मुख्याध्यापक नियुक्ती करण्याचे अधिकार शिक्षणाधिकारी यांना देण्याबाबत दिनांक २७ फेब्रुवारी, २०२३ च्या शासन निर्णयामध्ये सुधारणा करण्याची मागणी प्रस्तुत लोकप्रतिनिधी यांनी माहे मार्च, २०२३ पासून मा.मंत्री शालेय शिक्षण यांच्याकडे वेळोवेळी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दिनांक २७ फेब्रुवारी, २०२३ च्या शासन निर्णयामध्ये सुधारणा करण्याबाबत केलेल्या मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०२-०७-२०२६) :** (१) माध्यमिक स्तरावर संस्थेमध्ये वाद असल्यास व मुख्याध्यापकांची वेतननिश्चिती संस्थेमार्फत होणे शक्य नसल्यास अशा शाळांमधील मुख्याध्यापकांची वेतननिश्चिती, वेतनवाढी, सेवानिवृत्तीवेतनाबाबत निर्णय घेण्याचे अधिकार दिनांक ०६/०३/२०१० च्या शासन परिपत्रकान्वये शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांना देण्यात आले आहेत. तसेच, प्राथमिक स्तरावर

सुध्दा शैक्षणिक संस्थेच्या व्यवस्थापनामध्ये, वाद असल्यास, मुख्याध्यापकांची वेतननिश्चिती, वेतनवाढ, वरिष्ठ वेतनश्रेणी, निवडश्रेणी, भविष्य निर्वाह निधीविषयक प्रकरणे तसेच निवृत्तीवेतनासंदर्भातील प्रकरणे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचे स्तरावरून निर्णय घेण्याचे अधिकार दिनांक २७/०२/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रदान करण्यात आलेले आहेत.
(२) अशी कोणतीही बाब निदर्शनास आलेली नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अल्पसंख्यांक बहूल विद्यार्थी शिक्षण घेत असलेल्या शाळांना स्वतंत्र अल्पसंख्यांक दर्जा देणेबाबत

**(२) ५५७ (२४-०४-२०२५) श्री.इद्रिस नायकवडी :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांकडून जिल्हा परिषद / महानगरपालिका / नगरपालिका किंवा शासनाकडून चालविल्या जाणाऱ्या प्राथमिक व माध्यमिक शाळांतील अल्पसंख्यांक विद्यार्थी यांची वेगळी गणना केलेली नाही. हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ज्या शाळांमध्ये ५० टक्के पेक्षा जास्त विद्यार्थी अल्पसंख्यांक असतील तर त्या शाळांना अल्पसंख्यांकांचा दर्जा व सवलती देण्याबाबत तसेच अल्पसंख्यांक विद्यार्थींची गणना करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१९-०६-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) महाराष्ट्र राज्यातील अल्पसंख्याकांकडून चालविण्यात येणाऱ्या शैक्षणिक संस्थांना अल्पसंख्याक दर्जा प्रदान करण्याबाबतचे धोरण अल्पसंख्याक विभागाच्या दिनांक २७/०५/२०१३ रोजीच्या शासन निर्णयान्वये विहीत करण्यात आले असून त्यानुसार कार्यवाही करण्यात येते. अल्पसंख्याक विद्यार्थ्यांची गणना करण्याचे धोरण नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील इयत्ता पाचवी किंवा आठवीच्या परीक्षेत अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या शुल्क प्रतिपूर्तीबाबत

**(३) ११६९ (२४-०४-२०२५) श्री.अरुण लाड :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) इयत्ता पाचवी किंवा आठवीत विद्यार्थी अनुत्तीर्ण होऊन फेरपरीक्षेतही अपयशी ठरल्यास, विद्यार्थी पुन्हा त्याच वर्गात राहणार असताना शैक्षणिक वर्षाचे शुल्क शासनाकडून प्रतिपूर्ती केली जाईल की त्याच वर्गात राहिल्याने विद्यार्थ्याला शुल्क भरावे लागेल, याबाबत संभ्रम निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्राथमिक शिक्षण विभागाने याबाबत शासनाकडे,मार्गदर्शन करण्याची विनंती केली असून शासनाकडून मात्र अद्याप स्पष्टीकरण मिळालेले नसल्याचे दिनांक २५ डिसेंबर, २०२४ रोजी वा

त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने इयत्ता पाचवी किंवा आठवीत विद्यार्थी अनुत्तीर्ण होऊन फेरपरीक्षेतही अपयशी ठरल्यास, विद्यार्थी पुन्हा त्याच वर्गात राहणार असताना शैक्षणिक वर्षाचे शुल्क शासनाकडून प्रतिपूर्ती केली जाईल की त्याच वर्गात राहिल्याने विद्यार्थ्याला शुल्क भरावे लागेल याबाबत शाळांना मार्गदर्शन करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१८-०६-२०२६) :** (१) हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०२३ (सुधारणा), दिनांक २९ मे, २०२३ रोजीच्या अधिसूचनेनुसार इयत्ता ५ वी व इयत्ता ८ वी साठी वार्षिक परीक्षा, पुनर्परीक्षा व मूल्यमापन कार्यपध्दती दिनांक ०७/१२/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आलेल्या आहेत. सदर सूचनांनुसार इयत्ता ५ वी व ८ वी मध्ये शाळा विद्यार्थ्यांना अनुत्तीर्ण करत असल्याची बाब निदर्शनास आल्याने आप पालक युनियन यांनी दिनांक २०/०६/२०२४ रोजी शिक्षण संचालनालयास निवेदन सादर केले होते.
(२) व (३) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दिनांक १२/०७/२०२४ रोजीच्या पत्रान्वये आप पालक युनियन यांनी दिनांक २०/०६/२०२४ रोजीच्या निवेदनाच्या अनुषंगाने केलेल्या विनंतीनुसार, शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दिनांक ०७/१२/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये इयत्ता ५ वी व ८ वीच्या वार्षिक परीक्षेत अनुत्तीर्ण ठरलेल्या विद्यार्थ्यांसाठी वर्गोन्नती/ पुनर्परीक्षा/ सवलतीचे गुण देऊन देखील अपात्र ठरणाऱ्या / अनुतीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील प्रकरण ४ मधील १२ (१)(सी) नुसार, कलम २ मधील खंड (n) च्या उपखंड (तीन) व (चार) मध्ये विनिर्दीष्ट केलेल्या शाळांमध्ये दुर्वल व वंचित घटकातील बालक त्यांचे प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेतून काढून टाकले जाणार नाही, या तरतुदीनुसार इ. ५ वी व ८ वीच्या अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांबाबत शैक्षणिक खर्चाची प्रतिपुर्ती देय राहील, असे शासन पत्र, दिनांक २८/०८/२०२४ अन्वये कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील मोठ्या सिंचन प्रकल्पांच्या कालव्यांची दुरवस्था झाल्याबाबत

**(४) २२०३ (१७-०४-२०२५) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ६५ मोठ्या सिंचन प्रकल्पांच्या कालव्याची दुरवस्था झाली असून पाणी वाहून जाणे, पाण्याची पातळी मोजण्यासाठी यंत्र सामग्रीचा अभाव व मोठ्या प्रमाणात होणाऱ्या बाष्पीभवनामुळे सिंचनातील पाण्याची पातळी कमी झाली असून भीमा, काटेपूर्णा, नळगंगा, खडक पूर्णा, जायकवाडी, निम्न तेरणा, माजलगाव, मांजरा, गिरणा, मनार, आणि विष्णुपुरी या धरणांतून होणारे सिंचन गुणोत्तर प्रमाण

कमालीचे घटले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सिंचनाचे गुणोत्तर म्हणजेच धरणाच्या वरच्या भागात वापरले जाणारे पाणी आणि कालव्याच्या शेवटच्या भागाकडील पाणी वापराचे गुणोत्तर एक असणे चांगले मानले जाते, परंतु जायकवाडी सारख्या प्रकल्पात ते गुणोत्तर केवळ ०.०७% असल्याचे अहवालातून निदर्शनास आले असून, जायकवाडी सारख्या भव्य प्रकल्पात अपेक्षित सिंचन क्षमतेमध्ये मोठी घट दिसून येते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जायकवाडी धरणाच्या डाव्या कालव्याची लांबी २०८ किमी तर उजवा कालवा १३२ किमी असून या कालव्याना अनेक ठिकाणी छेद गेल्याने धरणातून ३५ ते ४० टक्के पाणी वाहून जात आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, जायकवाडी मधून ५ लाख ४९ हजार ८८६ हेक्टर जमीन सिंचीत होणे अपेक्षित असताना केवळ २ लाख ८ हजार हेक्टर (५१%) जमिनीचे सिंचन होत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, मराठवाडा दुष्काळाचा सामना करत असताना जायकवाडी तसेच इतर धरणांतून अशाप्रकारे पाण्याचा होणारा नाश टाळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (१९-०६-२०२६) :** (१) अंशत: खरे आहे.

राज्यातील काही मोठ्या सिंचन प्रकल्पांचे कालवे व त्यांतर्गतच्या वितरण प्रणाली जूनी झाल्यामुळे कालव्यांच्या वहन क्षमतेत घट झाली असून त्यामुळे प्रत्यक्ष सिंचनक्षेत्रावर परिणाम झाला आहे.
(२) सिंचनासाठी वापरलेले पाणी व धरणातून सोडलेले पाणी यांचे गुणोत्तर जल वहन कार्यक्षमता (water conveyance efficiency)असे संबोधले जाते. सदर गुणोत्तर अस्तरविरहीत कालव्याकरीता ०.६० ते ०.८० दरम्यान असते व अस्तरीकरण असलेल्या कालव्याकरीता महत्तम ०.९० ते ०.९५ इतके असते. जायकवाडी प्रकल्पामध्ये सद्य:स्थितीत हे गुणोत्तर ०.३८ इतके असल्याचे निदर्शनास आले आहे.
(३) हे अंशत: खरे नाही.

पैठण उजवा कालवा किमी ० ते १३२ हा सुस्थितीत आहे. तथापि, डाव्या कालव्यातून काही प्रमाणात गळती होत असून सदरील कालव्याचे अस्तरीकरणाचे काम नाबार्ड अंतर्गत MIIP टप्पा-२ मध्ये प्रस्तावित केले आहे.
(४) जायकवाडी प्रकल्पांतर्गत पैठण डावा कालव्याच्या २०८ कि.मी.लांबीतील सिंचन क्षमता १,४१,६४० हे. इतकी असून पैठण उजव्या कालव्याच्या १३२ कि.मी.लांबीतील सिंचन क्षमता ४१,६८२ हेक्टर आहे. जायकवाडी प्रकल्पाची एकूण सिंचन क्षमता १,८३,३२९ हेक्टर असून मागील चार वर्षातील प्रत्यक्ष सिंचनाचे सरासरी क्षेत्र १,५९,८०३ हे. म्हणजेच ८७.१७% आहे.
(५) पैठण डावा मुख्य कालव्याच्या रुपये ७३४.०० कोटी किंमतीच्या दुरुस्ती कामांचा समावेश महाराष्ट्र सिंचन सुधारणा कार्यक्रमातंर्गत (MIIP) करण्यात आला असून त्यानुषंगाने पुढील कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

पैठण उजवा मुख्य कालव्याचे दुरुस्तीचे काम प्रगतीपथावर असून त्यावरील वितरण व्यवस्थेच्या कामाचा समावेश जायकवाडी प्रकल्प टप्पा -२ च्या प्रस्तावित सुप्रमा मध्ये करण्यात आला आहे.

मराठवाड्यातील धरणांची व कालव्यांची नियमित देखभाल व दुरुस्तीची कामे महामंडळाकडील

सिंचन व बिगरसिंचन पाणीपट्टीच्या निधीतून आवश्यकतेप्रमाणे हाती घेतली जात आहेत. तसेच विशेष दुरुस्ती/ विस्तार व सुधारणा अंतर्गत धरण व कालव्याच्या दुरुस्तीची कामे व धरण सुरक्षितता कायद्याअंतर्गतच्या लेखाशीर्षातंर्गत धरण /बॅरेज यांच्या दुरुस्तीची कामे होती घेण्यात आली आहेत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील उपलब्ध पाणीसाठ्यात नियोजन करण्याबाबत

**(५) २६६५ (१८-०७-२०२५) श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात उन्हाच्या झळा तीव्र झाल्यामुळे केवळ ४०.४४ टक्के पाणीसाठा असून सुमारे ८ ते १० टक्के पाण्याचे बाष्पीभवन होत असल्याने तीव्र पाणी टंचाई होत असल्याचे माहे एप्रिल, २०२५ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील विविध जिल्ह्यात दरवर्षी भासत असलेली तीव्र पाणी टंचाई विचारात घेता याबाबत टॅंकरने किती जिल्हामध्ये पाणीपुरवठा करण्यात येतो शासनाने माहिती घेऊन उपलब्ध पाणीसाठ्याचे नियोजन करण्याबाबत व पाण्याचे स्त्रोत वाढविण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा येत आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (१२-०६-२०२६) :** (१) अंशत: खरे आहे.

माहे एप्रिल, २०२५ च्या तिसऱ्या आठवड्यामध्ये राज्यातील प्रकल्पांमधील एकूण उपयुक्त पाणीसाठी ३७.३२ इतका होता.
(२) माहे एप्रिल, २०२५ महिन्यामध्ये स्थानिक पातळीवरील मागणीनुसार २२ जिल्हयांमध्ये टॅंकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात आला आहे.

प्रकल्पातील उपलब्ध पाण्याचे नियोजन करण्याच्या अनुषंगाने शासन निर्णय, दिनांक ०७/०३/२००१ अन्वये धरणात साठणाऱ्या पाण्याच्या वापराचे सिंचनाच्या दृष्टीने नियोजन करण्याच्या दृष्टीने मार्गदर्शक सुत्रे निर्गमित करण्यात आली आहेत. शासन निर्णय दिनांक ०१/१२/२०१८ नुसार पाटबंधारे प्रकल्पांच्या जलाशयातील पाणी बिगर सिंचनासाठी आरक्षित/मोठ्या प्रमाणात पाण्याचा हक्क मंजूर करण्याबाबतचे निकष व कार्यपध्दती निश्चित केली असून त्यानुसार दरवर्षी १५ ऑक्टोबर च्या उपलब्ध पाणी साठ्याचे पुढील वर्षाच्या १५ जुलै पर्यंत पुरेल असे नियोजन करण्यात येते. तसेच राज्यातील पाणी टंचाईच्या दृष्टीने उपाययोजना करण्याबाबत सर्व अधीक्षक अभियंता यांना दिनांक २२/०२/२०२४ रोजीच्या पत्रान्वये शासनाच्या निर्णयानुसार काटकसरीच्या उपाययोजनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील क्रीडा क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी विविध विभागांच्या अखत्यारितील खेळांची मैदाने क्रीडा विभागाकडे वर्ग करण्याबाबत

**(६) ५००१ (१७-१२-२०२५) डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील क्रीडा क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी, शासनाच्या विविध विभागांच्या ताब्यात असलेली खेळांची मैदाने क्रीडा विभागाकडे वर्ग करण्याबाबतचा प्रस्ताव माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे सादर करण्यात आला असल्याचे निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील क्रीडापटूंना प्रोत्साहन देण्यासाठी तसेच त्यांचे आरोग्य सुरक्षित ठेवण्याच्या दृष्टिकोनातून, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर स्पर्धांमध्ये सहभागी होणाऱ्या खेळाडूंना वैद्यकीय विमा कवच उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वरील दोन्ही प्रस्तावांवर शासनाने तातडीने निर्णय घेऊन अंमलबजावणी करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्रीमती सुनेत्रा पवार (१०-०६-२०२६) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर उचित कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## येवला शहर आणि लासलगाव (जि.नाशिक) पोलीस ठाणे अंतर्गत निवासस्थाने व पोलीस कवायत मैदान संरक्षण भिंतीची कामे प्रलंबित असल्याबाबत

**(७) ६६१३ (१७-०३-२०२६) श्री.पंकज भुजबळ, श्री.इद्रिस नायकवडी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला शहर आणि लासलगाव पोलीस ठाणे अंतर्गत अधिकारी आणि पोलीस अंमलदार निवासस्थाने बांधकाम तसेच येवला पोलीस कवायत मैदान संरक्षण भिंत या कामांसाठी शासनाने दिनांक ७ मार्च २०२५ रोजीच्या पत्रान्वये पोलीस महासंचालकांकडून प्रस्ताव मागविलेले असून सदर कामांसाठी पोलीस अधीक्षक, नाशिक यांनी दिनांक १४ नोव्हेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान पोलीस महासंचालक मुंबई यांना प्रस्ताव पाठविलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येवला तालुका पोलीस स्टेशन विस्तारीत बांधकामाच्या अंदाजपत्रकाला प्रशासकीय मान्यता देण्यासाठी शासनाने दिनांक ७ मार्च, २०२५ रोजी पोलीस महासंचालकांकडून मागविलेला प्रस्ताव प्रलंबित असल्यामुळे पोलीस स्टेशनच्या विस्तारीत बांधकामाला माहे डिसेंबर, २०२५ अखेर सुरवात करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बांधकामाच्या प्रस्तावाबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०१-०७-२०२६) :** (१), (२) व (३) सदरहू विषयांबाबत मा.लोकप्रतिनिधी यांचे निवेदने शासनास प्राप्त झाली असून शासन पत्र दिनांक ०७ मार्च,२०२५ अन्वये त्यावर अहवाल मागविण्यात आला होता.यावर पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामीण यांनी दिनांक १४ नोव्हेंबर, २०२५ रोजीच्या पत्रान्वये लासलगाव पोलीस ठाणे येथील महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ यांचेकडे प्रस्ताव सादर करण्यात येत आहे, असा अहवाल सादर केला आहे.

त्यानुषंगाने नमुद करण्यात येते की, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडून पोलीस विभागाच्या निवासी व अनिवासी बांधकाम प्रकल्पाची प्राधान्यक्रम यादी प्राप्त झाल्यावर त्यास शासन मान्यता देऊन प्राधान्यक्रम यादीतील समावेश केलेल्या प्रकल्पाचे पुढील कामकाज पोलीस गृहनिर्माण महामंडळाकडून करण्यात येते.

याप्रमाणे गृह विभाग, शासन पत्र दिनांक १२/०१/२०२२ अन्वये मंजूर केलेल्या प्राधान्यक्रम यादीमध्ये येवला व लासलगाव पोलीस ठाणे प्रशासकीय इमारतीच्या बांधकाम प्रकल्पाचा समावेश करण्यात आला होता. त्यानुसार पोलीस गृहनिर्माण महामंडळाने प्रशासकीय इमारतीचे काम पूर्ण करुन इमारत पोलीस आस्थापनेस हस्तांतर केली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील यवतमाळ, बारामती, लातूर व धाराशिव विमानतळांचा कालबध्द विकास करून विमानसेवा सुरू करणेबाबत

**(८) ६७०४ (१७-०३-२०२६) डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.सदाशिव खोत : दिनांक १० डिसेंबर, २०२५ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १ मधील प्रश्न क्रमांक ३६२५ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील यवतमाळ, बारामती, लातूर आणि धाराशिव येथील विमानतळांचे व्यवस्थापन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून (MIDC) काढून महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीकडे (MADC) हस्तांतरित करण्याचा निर्णय माहे डिसेंबर, २०२५ मध्ये घेण्यात आला असून, सन २००९ मध्ये विकासासाठी खाजगी कंपनीला दिलेल्या या विमानतळांचा विकास कंपनीच्या अकार्यक्षमतेमुळे रखडला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २००९ मध्ये रिलायन्स एअरपोर्ट डेव्हलपर्स या खाजगी कंपनीला ३० वर्षांच्या करारावर ही विमानतळे देण्यात आली होती, परंतु संबंधित कंपनीने अकार्यक्षमतेमुळे करारातील अटींचे उल्लंघन करून वैधानिक थकबाकी न भरल्यामुळे व देखभाल-दुरुस्ती न केल्यामुळे गत १६ वर्षांपासून या विमानतळांचे कामकाज पूर्णपणे ठप्प झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खाजगी कंपनीच्या अकार्यक्षमतेमुळे धावपट्ट्यांची दुरवस्था झाली असून, केंद्र शासनाच्या ‘उड्डाण’ (UDAN) योजनेचा लाभ या जिल्ह्यांना मिळत नसल्याने प्रादेशिक दळणवळणाचे आणि उद्योगांचे मोठे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, खाजगी कंपनीने केलेल्या कराराच्या उल्लंघनामुळे व विकास कामातील दिरंगाईमुळे निर्माण झालेल्या या संपूर्ण प्रकाराची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्या अनुषंगाने MADC मार्फत विमानतळांचा विकास तातडीने पूर्ण करून विमानसेवा सुरू करण्यासाठी शासन कोणती कार्यवाही व उपायोजना करत आहे,
(५) असल्यास, या विमानतळांच्या विकासासाठी व नियमित विमानसेवा सुरू करण्यासाठी शासन विशेष 'कालबध्द सुधारणा' करणार आहे काय,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०२-०७-२०२६) :** (१), (२), (३), (४), (५) व (६) यवतमाळ, बारामती, लातूर आणि धाराशिव येथील विमानतळे अद्ययावत ठेवण्यासाठी व्यवस्थापन व देखभालीकरीता रिलायन्स एअरपोर्ट डेव्हलपर्स या खाजगी कंपनीला अटी व शर्तीसह ऑक्टोबर व नोव्हेंबर २००९ मध्ये ९५ वर्षाचा भाडेपट्टा करारनाम्यानुसार हस्तांतरीत करण्यात आली होती.

तथापि, मे. रिलायन्स एअरपोर्ट डेव्हलपर्स प्रा.लि. यांनी करारातील अटी व शर्तीचे उल्लंघन केल्यामुळे त्यांच्याकडून सदर विमानतळे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने (MIDC) ताब्यात घेतली.

उक्त विमानतळे विकास / देखभाल / दुरूस्तीकरीता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून (MIDC) महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीकडे (MADC) दिनांक ३०/१२/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये हस्तांतरीत करण्यात आली आहे. त्यानुसार सदर विमानतळांचा विकास / विस्तार / पायाभूत सुविधाबाबतची कार्यवाही सुरू आहे.

---

## कल्याण –डोंबिवली महानगरपालिकेत सन २०१९ मधील पदोन्नती कायम करण्यात आल्याबाबत

**(९) ६९२० (२४-०३-२०२६) ॲड.अनिल परब :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण –डोंबिवली महानगरपालिकेत सन २०१९ मध्ये राबविण्यात आलेल्या व दिलेल्या पदोन्नती कायम करण्यात आल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू पदोन्नती देण्याचा कालावधी माहे सप्टेंबर ते ऑगस्ट, २०२५ असा आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर पदोन्नतीसंदर्भात प्रसिध्द केलेल्या शासन निर्णयाप्रमाणे विभागीय लेखी परीक्षा घेण्यात आल्या आहेत काय,
(४) नसल्यास, त्याचे कारणे काय आहेत?

**श्री.एकनाथ शिंदे (२३-०६-२०२६) :** (१) हे खरे नाही.

सन-२०१९ मध्ये करण्यात आलेली पदोन्नती प्रक्रिया मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल असलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ च्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून शासनाकडील दिनांक

२९/१२/२०१७ च्या पत्रान्वये दिलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार पदोन्नतीच्या कोट्यातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात सेवाज्येष्ठतेनुसार भरण्याच्या निर्देशानुसार करण्यात आलेली आहे. सदरहू पदोन्नती तात्पुरत्या स्वरूपातील महापालिकेच्या आस्थापनेवरील रिक्त पदावर दिलेल्या असल्यामुळे कायम करण्यात आलेली नाही.

(२) हे खरे नाही.

सदरची पदोन्नती प्रक्रिया सन-२०१९ मध्ये करण्यात आलेली असून, सदर पदोन्नती निवडसूची वर्षाचा कालावधी १ सप्टेंबर २०१८ ते ३१ ऑगस्ट २०१९ असा आहे.

(३) नाही.

पदोन्नती संदर्भात प्रसिध्द केलेल्या शासन निर्णयाप्रमाणे कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत सन २०१९ मध्ये दिलेल्या पदोन्नतीच्या वेळी विभागीय लेखी परीक्षा घेण्यात आलेली नाही ही वस्तुस्थिती आहे.

(४) कल्याण डोंबिवली महानगरपालिकेमध्ये विभागीय लेखी परीक्षा आजपर्यंत घेतली गेली नाही. महापालिकेच्या आस्थापनेवर पदोन्नतीची रिक्त पदे असल्यामुळे पदोन्नती देताना विभागीय पदोन्नती निवड समितीने विभागीय लेखी परीक्षा हा निकष विचारात घेतलेला नाही.

कल्याण डोंबिवली शहर महानगरपालिका सेवा (सेवा भरती व सेवांचे वर्गीकरण) नियम २०१० मधील परिशिष्ट ३ महानगरपालिका कर्मचाऱ्यांसाठी विभागीय परिक्षेबाबत विनियम २०१० मधील नियम १२ मध्ये आयुक्तांना अधिकार देण्यात आलेले आहेत.

---

## राज्यमार्ग परिवहन महामंडळाच्या अकोला विभागातील मंगरूळपीर आगारात मृत्यू पावलेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसांना भविष्य निर्वाह निधी न मिळाल्याबाबत

**(१०) ६९८० (१७-०३-२०२६) श्री.वसंत खंडेलवाल :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ अकोला विभागातील वाशिम जिल्ह्यातील मंगरूळपीर आगार येथे वाहक पदावर कार्यरत असलेले कै. अंबादास झळके यांचा दिनांक ११ जानेवारी २०१० ला मृत्यू झाल्यामुळे, त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या पत्नीला पंधरा वर्षाच्या दीर्घ कालावधी उलटूनसुद्धा भविष्य निर्वाह निधीची व इतर देय रक्कम मिळणे बाबतचे निवेदन लोकप्रतिनिधी यांनी विभागीय नियंत्रण अकोला व उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ मुंबई यांना दिनांक २० ऑगस्ट, २०२५ रोजी वा त्यादरम्यान दिले. हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्रीमती लक्ष्मी झळके यांना भविष्य निर्वाह निधीची व इतर देय रक्कम मिळण्याबाबत वारंवार पाठपुरावा करून व निवेदन देऊनही सहा महिन्याचा कालावधी होवूनही महामंडळाकडून अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, पंधरा वर्षाचा कालावधी उलटून सुद्धा भविष्य निर्वाह निधी व इतर देय रक्कम श्रीमती झळके यांना तात्काळ मिळणेबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली व प्रदीर्घ कालावधी होऊनही सदरचा निधी देण्यात विलंबाबाबत दिरंगाई करणाऱ्या संबंधिताविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक (०२-०७-२०२६) :** (१), (२), (३) व (४) दिवंगत अंबादास झळके हे रा.प. सेवेतून बडतर्फ केलेले असून त्यांचा मृत्यू दिनांक ११ जानेवारी, २०१० रोजी झाला आहे. त्यांच्या मृत्यूपश्चात कायदेशीर वारसदाराकडून भविष्य निर्वाह निधी रक्कमेची मागणी केलेली नाही. तथापि, श्रीमती झळके यांनी दिनांक २२ ऑक्टोबर, २०२४ रोजी अर्ज केल्याने त्यांना दिनांक २९/०८/२०२५ रोजी भविष्य निर्वाह निधीची रुपये ६,८०,२३५/- इतकी रक्कम अदा करण्यात आलेली आहे. अर्जाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात आलेली असून त्यामध्ये दिरंगाई झालेली नाही.

---

## पुणे जिल्ह्यात अवैध दारू निर्मिती व विक्री होत असल्याबाबत

**(११) ७०४९ (२४-०३-२०२६) श्री.योगेश टिळेकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यात अवैध दारू तयार करून त्याची विक्री केली जात असून सदर प्रकरणी राज्य उत्पादन शुल्क विभागाने निदर्शनास आणून कारवाई केली असल्याची घटना माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान घडली असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कारवाईत मद्यनिर्मिती मशीन, बनावट सिलबंद बाटल्या, विविध ब्रँडचे देशी-विदेशी मद्य, बुचे, लेबल व वाहनांसह मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा प्रकारे अवैध दारू तयार करून विक्री करणाऱ्या टोळया पुणे जिल्ह्यात कार्यरत असून सदर प्रकरणी तपास व आळा घालण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्रीमती सुनेत्रा पवार (२९-०६-२०२६) :** (१) व (२) हे खरे आहे.

दिनांक २४/१२/२०२५ रोजी राज्य उत्पादन शुल्क विभागाद्वारे हिंजवडी, ता.मुळशी, जि.पुणे येथे टाकण्यात आलेल्या छाप्याच्या अनुषंगाने गुन्हा नोंद क्रमांक ३०१/२०२५ दाखल करण्यात आला आहे. यामध्ये २ आरोपींना अटक करण्यात आली असून एकूण रुपये ६,९९,५५०/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

तसेच, दिनांक २७/१२/२०२५ रोजी राज्य उत्पादन शुल्क विभागाद्वारे भोसरी ता.हवेली, जि.पुणे येथे टाकण्यात आलेल्या छाप्याच्या अनुषंगाने गुन्हा नोंद क्रमांक ४३६/२०२५ दाखल करण्यात आला आहे. यामध्ये २ आरोपींना अटक करण्यात आली असून एकूण रुपये २४,०७,१७०/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

(३) अवैध दारू तयार करून विक्री करणाऱ्या टोळ्यांना आळा घालण्यासाठी पुणे जिल्ह्यात राज्य उत्पादन शुल्क विभागाची एकूण १८ कार्यकारी घटक व ०३ भरारी पथके कार्यरत असून, सर्व प्रकारच्या अवैध व्यवसायावर कारवाया करणेबाबत आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क यांच्यामार्फत वेळोवेळी निर्देश देण्यात येतात.

पुणे जिल्ह्यात दिनांक ०१/०४/२०२५ ते दिनांक २५/०३/२०२६ या कालावधीमध्ये बनावट मद्य

निर्मिती घटक, बनावट व कर बुडवलेली स्कॉच, परराज्य मद्य या संदर्भात एकूण ४० गुन्हे नोंदविण्यात आलेले असून त्यामध्ये ८९ आरोपींना अटक करून एकूण ४३ वाहनांसह रुपये ६ कोटी किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्य मार्ग परिवहन महामंडळाची मुंबई विभागातील ११ आगारे तोटयात असल्याबाबत

**(१२) ७४४० (१७-०३-२०२६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्यमार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) मुंबई विभागातील मुंबई सेंट्रल आणि उरण हे बस आगार सर्वाधिक तोटयात असून यासंदर्भात घेतलेल्या आढाव्यात राज्यातील एकूण ११ बस आगारे तोटयात असल्याचे माहे डिसेंबर,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेवून सदरील आगारांना तोटयातून बाहेर काढण्यासाठी कोणती कार्यवाही केली आहे वा येत आहे,
(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.प्रताप सरनाईक (०२-०७-२०२६) :** (१) होय.
(२) व (३) मध्यवर्ती कार्यालयाकडुन रा.प. महामंडळातील तोट्यातील आगारांबाबत प्रादेशिक व्यवस्थापक, विभाग नियंत्रक, विभागीय वाहतूक अधिकारी, संबंधित आगाराचे आगार व्यवस्थापक यांची वारंवार आढावा बैठक घेऊन तोट्याची कारणमिमांसा व त्यावरील उपाय योजना बाबत मार्गदर्शन केले जात आहे.

रा.प.मुंबई विभागातील मुंबई सेंट्रल व उरण आगार या आगारांचा तोटा हा विभागात सर्वात जास्त असल्याने सदर दोन्ही आगारांच्या तोट्याची कारणमिमांसा तपासून आगारामार्फत चालनात असणाऱ्या फेऱ्यांचे सुसूत्रीकरण करण्यात आले आहे. तसेच, लांब व मध्यम लांब पल्याच्या नियातांमध्ये वाढ करण्यात आली आहे. आगारांना दरमहा वाहतूक उत्पन्नाचे उद्दिष्ट निश्चित करुन उदिष्ट पुर्ततेबाबत आगारांच्या आढावा बैठका घेऊन तोटा कमी करण्यासाठी आगार व्यवस्थापकांना मार्गदर्शन करुन अंमल बजावणीसाठी पाठपुरावा करण्यात येत आहे.

---

## कर्जत (जि.ठाणे) तालुक्यातील ममदापूर वाडीतील स्त्याची दुरवस्था झाल्याबाबत

**(१३) ८३९० (२४-०३-२०२६) श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कर्जत (जि.ठाणे) तालुक्यातील नेरळ विकास प्राधिकरण हददीत असलेल्या ममदापूरवाडीकडे जाणाऱ्या दोन कि.मी. रस्त्याचे नुकतेच डांबरीकरण करण्यात आले असून या रस्त्याचे काम निकृष्ट झाल्यामुळे अवघ्या १५ दिवसात डांबर व खडी बाहेर आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेवून या रस्त्याचे निष्कृष्ट काम करणारे कंत्राटदार, संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (२९-०६-२०२६) :** (१) हे खरे नाही. विषयांकित रस्त्याचे काम निविदा अटी शर्तीनुसार करून घेण्यात आले असून रस्ता सुस्थितीत आहे.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्य शासनाककडून पुरस्कार प्राप्त नागरिकांना वातानुकुलीत बसेसमधील प्रवास मोफत करण्याबाबत

**(१४) ८५३० (२४-०३-२०२६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत सामाजिक कार्य करणाऱ्या व्यक्तिंना डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार व इतर पुरस्कार प्रदान करणाऱ्या पुरस्कार्थी यांचा सन्मान चिन्ह प्रमाणपत्र व रोख पारितोषिक देऊन शासनाकडून शासन निर्णयानुसार सन्मान करण्यात येत असून सामाजिक न्याय विभागकडून पुरस्कार व्यक्तिंना त्यांना समाज कार्य करण्यासाठी संपूर्ण राज्यात फिरण्या करता मोफत साधी बस, निम-आराम,आराम, रातराणी इत्यादी एस.टी. च्या बसेस मधून मोफत एस.टी. प्रवास सवलतीचा पास देण्यात येतो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्य शासनाने वयाची ६५ वर्षे पूर्ण करणाऱ्या जेष्ठ नागरीकांना ५०टक्के व ७५ वर्षे पूर्ण करणाऱ्या वयोवृद्धांना १०० टक्के सवलत एस.टी महामंडळाच्या साधी, आराम, निम-आराम,रातराणी, शिवशाही, शिवनेरी तसेच सर्व वातानुकूलीन एस.टी. बसेस मधून दिली जाते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ज्येष्ठ नागरीक व ७५ वर्षे पूर्ण करणारी व्यक्ती व महिला यांना सुधारीत शासन निर्णयानुसार एस.टी.च्या सर्व वातानुकूलित बसेस मधून सवलत दिल्या जातील परंतु समाजाची सेवा करणाऱ्या समाजसेवेसाठी कार्य करणाऱ्या शासनाने समाज भूषण पुरस्कार देऊन सन्मान केलेल्या पुरस्कारर्थ्यांना एस.टी.चा वातानुकूलित बसेस मधून मोफत प्रवास सवलत दिली जात नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष, सहाय्य विभागामार्फत सामाजिक कार्य करणाऱ्या व्यक्तिस डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार व तस्सम इतर पुरस्कार प्राप्त झालेल्या (समाजसेवा करणाऱ्या) व्यक्तिंना शासनाच्या शासन निर्णयानुसार ज्या प्रमाणे एस.टी.बस साधी । निम-आराम / आराम / रातराणी इ. बसेस मधूम मोफत प्रवास पास दिला जातो, त्याचप्रमाणे शिवशाही, शिवनेरी व इतर वातानुकुलीत असलेल्या बसेसमधून मोफत प्रवास करुन देण्याबाबत शासनाने सुधारीत शासन निर्णयाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक (०१-०७-२०२६) :** (१) व (२) होय.
(३) दिनांक ०९/१०/२०१८रोजीच्या शासन निर्णयानुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभुषण पुरस्कार (दलितमित्र प्ररस्कार) प्राप्त व्यक्ती आणि त्याची/तिचा पत्नी/पती अथवा एक साथीदार यांना

रा.प.महामंडळाच्या साधी व निमआराम बसेसमध्ये प्रवासभाड्यात १०० टक्के सवलत देण्यात येते.
(४) व (५) रा. प. महामंडळाच्या बसेसमध्ये प्रवास सवलतींच्या प्रस्तावावर कार्यवाही सुरू आहे.

---

## वेंगुर्ला (जि. सिंधुदुर्ग) तालुक्यातील कोचरा, चव्हाटा, आगरवाडी, राऊतवाडी रस्त्यांवरील मोठ्या पुलाच्या बांधकामाबाबत

**(१५) ८५३९ (२४-०३-२०२६) श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोचरा चव्हाटा, आगरवाडी, राऊतवाडी (जि.सिंधदुर्ग, ता.वेंगुर्ला) रस्ता ग्रामीण मार्ग कि.मी १/०५० मधील मोठ्या पुलाचे बांधकाम मे. समृध्द इंटरप्राईजेस या कंत्राटदारा मार्फत सुरू असून ते प्रशासनाच्या दुर्लक्षतेमुळे विहित मुदतीत पूर्ण झाले नसल्याचे दिनांक ७ जानेवारी, २०२६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कामाबाबत मा सरपंच, लोकप्रतिनिधी, ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त केली असून कंत्राटदार सदर प्रकरणी दुर्लक्ष करत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संदर्भात शासनाने माहिती घेऊन सदर काम तातडीने पूर्ण करण्याच्या दृष्टीने जबाबदार अधिकारी, कर्मचारी कंत्राटदार यांच्यावर कारवाई करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (२९-०६-२०२६) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

सदर कामाचे कार्यारंभ आदेश मे. समृध्दी एंटरप्रायझेस यांना दिनांक ९/१०/२०२४ रोजी देण्यात आले असून कामाची मुदत दिनांक ८/१०/२०२५ पर्यंत होती. दरम्यानच्या काळात पर्यायी मार्गासाठी (Diversion) जागेच्या उपलब्धतेकरीता स्थानिक शेतकऱ्यांनी अडथळा केल्याने प्रत्यक्ष काम सुरु करता आले नाही. त्या पार्श्वभूमीवर कामास दिनांक ९/०४/२०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली.
(२) सदर कामात झालेल्या विलंबाबाबत स्थानिक ग्रामस्थ मा.सरपंच कोचरा यांनी विभागाकडे नाराजी व्यक्त केली असल्याने व ठेकेदाराने काम अपेक्षित गतीने सुरु न केल्याने विभागाने दिनांक ७/०१/२०२६ रोजी काम सुरु करणेबाबत कंत्राटदारास ताकीद दिली असून कंत्राटदारावर दंडात्मक कार्यवाही करण्यात आली आहे.
(३) सदरचे काम पूर्ण करण्यास विलंब होत असल्या प्रकरणी संबंधित ठेकेदारास दंडात्मक कारवाई करुन दिनांक २७/०२/२०२६ रोजी पासून प्रतिदिन रुपये ६००/- इतका दंड लावण्यात आला आहे. सध्या पायाचे काम सुरु असून लवकरात लवकर काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील प्राविण्यप्राप्त खेळाडूंना शासकीय, निमशासकीय व इतर क्षेत्रांतील नोकरीसाठी ५ टक्के आरक्षण देण्याबाबत

**(१६) ८६०२ (२४-०३-२०२६) श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्राविण्यप्राप्त खेळाडूंना शासकीय, निमशासकीय व इतर क्षेत्रांतील नोकरीसाठी ५ टक्के आरक्षण देण्याबाबत शासनाने दिनांक १ जुलै, २०१६ रोजी वा त्यासुमारास निर्गमित केलेला शासन निर्णयानुसार उक्त खेळाडूंचा संवर्ग (गट-अ, गट-ब, गट-क) निश्चित करण्यासाठी संबंधित विभागीय उपसंचालकांकडून त्यांच्या क्रीडा प्रमाणपत्रांची पडताळणी करून घेणे आवश्यक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील नवोदय विद्यालय समिती अंतर्गत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी राज्य व राष्ट्रीय स्तरावर क्रीडा क्षेत्रात प्राविण्य मिळविल्यानंतरही, त्यांचा संवर्ग निश्चित करण्यासाठी आवश्यक असलेले प्रमाणपत्र पडताळणीचे अर्ज विभागीय उपसंचालकांकडून स्वीकारले जात नसल्यामुळे नवोदय विद्यालय समितीतील प्राविण्यप्राप्त खेळाडू नोकरीत मिळणाऱ्या आरक्षणापासून वंचित राहत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नवोदय विद्यालय समितीतील प्राविण्यप्राप्त खेळाडू नोकरीतील आरक्षणापासून वंचित राहू नयेत, यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्रीमती सुनेत्रा पवार (२४-०६-२०२६) :** (१) अंशत: हे खरे आहे.

शासनाच्या दिनांक ०१ जुलै, २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार संबंधित विभागीय उपसंचालकांकडून क्रीडा अर्हतेनुसार खेळाडूंना संवर्ग (गट-अ, गट-ब, गट-क) नुसार क्रीडा प्रमाणपत्रांची पडताळणी करून घेणे आवश्यक होते.

तथापि, दिनांक ०८ जानेवारी, २०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये खेळाडूंना ब्लॉकचेन (Blockchain) तंत्रज्ञानावर आधारित “क्रीडा ई-प्रमाण” प्रणालीद्वारा उपसंचालक (मुख्यालय) क्रीडा व युवक सेवा, पुणे यांच्याद्वारे क्रीडा अर्हतेनुसार खेळाडू प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

(२) व (३) होय, हे खरे आहे.

नवोदय विद्यालयात आयोजित स्पर्धांचा समावेश दिनांक ०१/०७/२०१६ रोजीच्या शासन निर्णयात नसल्याने सदर खेळाडू पडताळणीसाठी पात्र ठरत नाहीत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील मिठी नदीच्या रुंदीकरणाचे काम पूर्ण करण्याबाबत

**(१७) १०४३३ (२०-११-२०२१) श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मिठी नदीचे रुंदीकरणाचे काम महानगरपालिकेने प्राधान्याने हाती घेतले परंतु १६ वर्षानंतरही यातील एकाही टप्याचे काम पूर्ण होऊ शकलेले नसल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान

निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मिठी नदीच्या काठावरील अनधिकृत बांधकामे हटवून रुंदीकरणाचे काम लवकरात लवकर पूर्ण करावे अशी मागणी होत असल्याचे दिनांक ७ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे,हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गत १६ वर्षे होवून गेल्यावरही मिठी नदीचे रुंदीकरण अपूर्णच राहिल्याने मिठी नदीला आलेल्या पुरामुळे मोठ्या प्रमाणात वित्तहानी व जीवितहानी झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर अनधिकृत बांधकामे तातडीने हटवून मुंबईतील मिठी नदीच्या रुंदीकरणाचे काम तात्काळ करण्याबाबत शासन कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१०-०३-२०२६) :** (१) हे अंशत: खरे आहे.

मिठी नदी विकास प्रकल्पाची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरीता महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय क्र. एमआरडी-३३०५ / प्र.क्र. १०९ / नवि-७ दिनांक १९/०८/२००५ अन्वये मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली मिठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरणाची स्थापना केली. सदर शासन निर्णयान्वये मिठी नदीची फील्टरपाडा, पवई ते सी.एस.टी. पूल कुर्ला दरम्यानची विकास कामे मुंबई महानगरपालिकेमार्फत व सी.एस.टी. पूल कुर्ला ते माहिम कॉजवे दरम्यानची विकास कामे एम.एम.आर.डी.ए. मार्फत मिठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरण यांच्या मार्गदर्शनांतर्गत करण्यात आलेली आहे.

महानगरपालिकेच्या अखत्यारीत असलेल्या मिठी नदी विकास प्रकल्पाचे काम दोन टप्प्यांमध्ये करण्यात आलेली असून त्यातील टप्पा १ अंतर्गत मिठी नदीचे १६ ते ६० मी रुंदीकरण व गाळ काढण्याचे काम माहे एप्रिल २००६ ते जून २००६ दरम्यान पूर्ण करण्यात आलेले आहे. तसेच, टप्पा २ अंतर्गत (सन २००७ ते २०१९ दरम्यान), चितळे समिती, केंद्रीय जल व विद्युत संशोधन केंद्र आणि आय.आय.टी.मुंबई यांनी सादर केलेल्या अहवाल /शिफारसीनुसार, तसेच मिठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरण यांच्या मान्यतेनुसार मिठी नदीचे अतिरिक्त रुंदीकरण, खोलीकरण, संरक्षक भिंत व सेवा रस्ता बांधण्याचे काम अंतर्भूत केलेले होते. त्यामधील रुंदीकरण व खोलीकरणाचे काम ९५%, संरक्षक भिंत बांधण्याचे काम ९०% व सेवा रस्ता बांधण्याचे काम ३५% इतके पूर्ण झालेले आहे.

तसेच, सी.एस.टी. पूल कुर्ला ते माहिम कॉजवे दरम्यानची विकास कामे एम.एम.आर.डी.ए. मार्फत राबविण्यात आलेली असल्यामुळे त्याबाबतचे अभिप्राय एम.एम.आर.डी.ए. कार्यालयाशी संबंधित आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.

सन २०१९ नंतर महानगरपालिकेने टप्पा २ अंतर्गत असलेले मिठी नदीचे उर्वरित रुंदीकरण, खोलीकरण, संरक्षक भिंत व सेवा रस्ता बांधण्याची कामे, मिठी नदी विकास व प्रदूषण नियंत्रण प्रकल्प पॅकेज-२ अंतर्गत अंतर्भूत केलेली आहेत. आजमितीपर्यंत एकूण उर्वरित ४०७५ मीटर लांबी पैकी २४२५ मीटर लांबीचे संरक्षक भिंत बांधण्याचे काम पूर्ण झालेले असून, उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत व त्यातील बहुतांश भाग अतिक्रमणे, न्यायालयीन प्रकरणे, खाजगी जागेचे अधिग्रहण इ. मुळे बाधित आहे.

तसेच, सन-२०१९ नंतर एम.एम.आर.डी.ए.च्या अखत्यारित असलेल्या मिठी नदीचे (सी.एस.टी. पूल कुर्ला ते माहिम कॉजवे दरम्यान) उर्वरित रुंदीकरण, खोलीकरण, संरक्षक भिंत बांधणे व सेवा रस्ता बांधण्याचे काम एम.एम.आर.डी.ए. व बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्यातील संयुक्त बैठकीत ठरल्यानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मिठी नदी प्रदूषण नियत्रंण (पॅकेज-३) प्रकल्पात अंतर्भूत करण्यात आलेले असून, भरती प्रवण क्षेत्रातील मिठी नदी व वाकोला नदीत विविध पातमुखांद्वारे उत्सर्जीत होणारे सांडपाणी अडवून मुख्य मलनि:सारण वाहिन्यांमध्ये वळविणे, उदंचन पंप सुविधेसह पूर प्रतिबंधक दरवाजे (फ्लड गेट) बांधणे, प्रामनेड बांधणे ई. कामांचा देखिल अंतर्भाव करण्यात आलेला आहे. सदर कामाची निविदा मागविण्यात आली आहे.

(३) हे खरे नाही.

(४) मिठी नदीचे उर्वरित रुंदीकरणाचे काम उप प्रमुख अभियंता (प.ज.वा.) पू.उ यांच्या कार्यालयामार्फत पॅकेज-२ व पॅकेज-३ च्या माध्यमातून हाती घेण्यात आले आहेत.

पॅकेज-२ अंतर्गत मिठी नदीचे रुंदीकरणाचे काम

मुख्यत: एल विभागातील किस्मत नगर (७०० मिटर लांबी), स्टॅनली चाळ ते होळकर हाऊस (१२० मिटर लांबी) आणि एच / पूर्व विभागातील बक्षीसिंग कंपाऊंड (१७० मिटर लांबी) येथे शिल्लक असून, पॅकेज-३ अंतर्गत मिठी नदीचे रुंदीकरणाचे काम मुख्यत: एल विभागातील टॅक्सीमेन कॉलनी (३०० मिटर लांबी) व जी/उत्तर विभागातील महाराष्ट्र नेचर पार्क ते पिवळा बंगला (५०० मिटर लांबी) येथे शिल्लक आहे. तसेच, पॅकेज-३ अंतर्गत वाकोला नदीचे रुंदीकरणाचे काम मुख्यत: एच/पूर्व विभागातील वाल्मिकी नगर परिसर (४०० मिटर लांबी) येथे उर्वरित आहे.

सद्य:स्थितीत, पॅकेज-२ अंतर्गत नदीचे उर्वरित रुंदीकरणाबाबत सर्वेचे काम उप प्रमुख अभियंता (प.ज.वा.) पू.उ. विभाग, 'एल' विभाग कार्यालय व एच/पूर्व विभाग कार्यालय यांच्यामार्फत संयुक्तरित्या करण्यात आलेले असून, बाधित झोपडीधारकांची पात्रता / अपात्रता यादी निश्चितीचे काम 'एल' विभाग कार्यालय व 'एच/पूर्व' विभाग कार्यालय मार्फत प्रगतिपथावर आहे. तसेच, पॅकेज-३ अंतर्गत नदीचे उर्वरित रुंदीकरणाबाबत सर्वेचे काम संयुक्तरित्या उप प्रमुख अभियंता (प.ज.वा) पू.उप. विभाग, 'एल' विभाग, 'एच/पूर्व' विभाग व जी/उत्तर विभाग कार्यालयांमार्फत प्रगतिपथावर आहे.

(५) लागू नाही.

---

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नायर रुग्णालयाच्या वैद्यकीय महाविद्यालयामधील प्राध्यापकांच्या रिक्त जागा भरण्याबाबत

**(१८) १८७८३ (०३-०५-२०२३) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील नायर रुग्णालयात विविध आजारासंदर्भात ५१ विभाग असून सदर रुग्णालयांतून दररोज २५०० रुग्णांवर तथा दरवर्षी १४ लाख रुग्णांवर उपचार करण्यात येतात. तथापि, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नायर रुग्णालयातील वैद्यकीय महाविद्यालयामधील प्राध्यापकांच्या जागा रिक्त असल्यामुळे कार्यरत डॉक्टरांवर अतिरिक्त कामाचा ताण येत असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा

त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नायर रुग्णालयामध्ये प्राध्यापकांच्या ३५, सहयोगी प्राध्यापकांच्या २२, सहाय्यक प्राध्यापकांच्या १३० जागा अनेक वर्षांपासून रिक्त आहेत, तसेच गत ६ ते ७ वर्षे काम करणाऱ्या सहाय्यक प्राध्यापकांना बढतीसुध्दा देण्यात आली नसल्यामुळे कार्यरत डॉक्टरांवर कामांचा प्रचंड ताण येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नायर रुग्णालयातील प्राध्यापकांच्या रिक्त जागा भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२१-०१-२०२६) :** (१) हे खरे नाही.
बा.य.ल नायर धर्मा. रुग्णालय व टो.रा. वैद्यकिय महाविद्यालयातील अध्यापकीय संवर्गातील पदांचा तपशील खालीलप्रमाणे-

| पदनाम | एकूण पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | % भरलेली पदे |
|---|---|---|---|---|
| प्राध्यापक | ७८ | ४५ | ३३ | ५८% |
| सहयोगी प्राध्यापक | ११५ | ८४ | ३१ | ७३% |
| सहाय्यक प्राध्यापक | १८४ | नियमित पदे ५०<br>कंत्राटी पदे ७९<br>एकूण पदे १२९ | ५५ | ७०% (एकूण भरलेली पदे व कंत्राटी तत्वावरील भरलेली पदे मिळून एकूण टक्के) |

(२) हे खरे नाही.
प्राध्यापक संवर्गातील जागा रिक्त असल्या तरी त्याखालील सहयोगी प्राध्यापक पदे ७३% भरलेली आहेत व सहाय्यक प्राध्यापक संवर्गातील रिक्त पदे ७०% पदे ही कंत्राटी तत्त्वावर भरण्यात आलेली आहेत.
(३) प्राध्यापक संवर्गाच्या रिक्त जागा भरण्याबाबतची कार्यवाही सेठ गो.सु. वैद्यकिय महाविद्यालयामार्फत करण्यात येते. प्राध्यापक संवर्गाच्या रिक्त पदांपैकी ५०% पदे ही पदोन्नतीने व ५०% पदे ही सरळ सेवेने भरण्यात येतात. सद्य:स्थितीत पदोन्नतीने रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## दापोली (जि.रत्नागिरी) येथील कोकण कृषी विद्यापीठात भरतीचा प्रश्न रखडला असल्याबाबत

**(१९) २०३९७ (०८-०८-२०२३) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दापोली (जि.रत्नागिरी) येथील कोकण कृषी विद्यापीठात भरती प्रलंबित असल्याचे तसेच कृषी विद्यापीठाच्या बिंदू नामावलीचा प्रस्ताव मंत्रालयात पाठविला असून भरती न झाल्यास विद्यापीठाच्या अधिस्वीकृतीला मान्यता मिळण्याबाबत अडचणीला सामोरे जावे लागणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विद्यापीठातील कर्मचाऱ्यांच्या वेतनाच्या दहा टक्के कंटेजन्सी अनुदान देण्याची पध्दत आहे. या निधीचा वापर हा संशोधनासाठी केला जातो परंतु कोरोना कालखंडानंतर कंटेजन्सी अनुदान मिळत नसल्यामुळे संशोधनावर विपरीत परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विद्यापीठात कंत्राटी कर्मचाऱ्यांची तात्पुरती भरती करण्यात आली असून त्यांचे वेतन राज्य सरकारने द्यावे, राहुरी प्रमाणे कोकण कृषी पदव्युत्तर विभाग स्वतंत्र करावे, शिक्षक भरतीच्या अटी शिथिल कराव्यात अशा मागण्या करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त मागण्या पूर्ण करुन कोकण कृषी विद्यापीठामध्ये भरती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे (०२-०३-२०२६) :** (१) महाराष्ट्र राज्यातील सामाजिक आणि शैक्षणिदृष्ट्या मागास (एसईबीसी) वर्गाकरीता आरक्षण अधिनियम, २०२४ (सन २०२४चा महाराष्ट्र अधिनियम क्र. १६) अन्वये "सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग" निर्माण करण्यात आला आहे.
उक्त अधिनियमातील कलम ५(१) नुसार सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्गांसाठी १० टक्के आरक्षण देण्यात आले आहे. सामाजिक आणि शैक्षणिक मागासवर्गाकरीता आरक्षणाच्या तरतुदीनुसार सरळसेवा भरतीसाठी सुधारित बिंदुनामावली विहीत करणेबाबतची कार्यवाही कृषी विद्यापीठ स्तरावर सुरू आहे,
(२) हे खरे नाही.
राज्यातील चारही कृषी विद्यापीठांना कार्यक्रम व अनिवार्य खर्चाच्या लेखाशीर्षांतर्गत ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर) या उद्दीष्टाखाली विद्यापीठाच्या आकस्मिक खर्चाकरीता दरवर्षी निधी अर्थसंकल्पीत करण्यात येतो. तसेच सदरचा निधी चारही कृषी विद्यापीठांना वितरित करण्यात येत आहे.
(३) शिक्षकवर्गीय पदांची भरती तसेच वेतन हे विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्वानुसार करण्यात येते. राज्यातील कृषी विद्यापीठातील शिक्षकवर्गीयांना सातव्या वेतन आयोगानुसार विद्यापीठ अनुदान आयोगाची सुधारित वेतन संरचना दिनांक १२/०८/२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये लागू करण्यात आली आहे. कृषी विद्यापीठांतील सहाय्यक प्राध्यापकांच्या शैक्षणिक पात्रतेत दिनांक १/०३/२०२४ रोजीच्या अधिसूचनेनुसार सुधारणा करण्यात आली आहे.
(४) राज्यातील कृषी विद्यापीठातील प्रकल्पग्रस्तांच्या भरती प्रक्रियेस शासन निर्णय दिनांक १४/१०/२०२४ नुसार मान्यता देण्यात आली आहे. तसेच भरती प्रकिया राबविण्याच्या दृष्टिकोनातून कृषी विद्यापीठांचा आकृतिबंध सुधारित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांत क्षयरोगावरील औषधांचा पुरवठा करण्याबाबत

**(२०) २२८६९ (२९-०६-२०२४) श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांत क्षयरोगावरील औषधांचा तुटवडा भासत असल्याने क्षयग्रस्त रुग्णांच्या उपचारात सातत्य ठेवण्यात अडसर निर्माण होत असल्याची बाब दिनांक १ डिसेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांत क्षयरोगावरील औषधांचा पुरवठा सुरळीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२१-०२-२०२६) :** (१) व (२) हे अंशतः खरे आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये मुंबई जिल्हा क्षयरोग नियंत्रण सोसायटीला भारत सरकारच्या केंद्रीय क्षयरोग विभागाकडून टीबीविरोधी औषधे मिळतात. कोणत्याही कारणास्तव औषधांचा तुटवडा असल्यास केंद्रीय क्षयरोग विभाग राज्य क्षयरोग कार्यालयाला परवानगी देते आणि राज्य क्षयरोग कार्यालय मुंबई शहर टीबी कार्यालयास परवानगी आणि बजेट वाटप करते. मुंबईत डिसेंबर, २०२३ दरम्यान काही काळ औषध प्रतिरोधी रुग्णांसाठी आवश्यक असणाऱ्या औषधांचा (Cap. Clofazimine, Cap. Cycloserine, Tab Linezolid) अनियमित पुरवठा केंद्रीय क्षयरोग विभागाद्वारे होत होता. यास्तव मुंबईतील सर्व जिल्हा क्षयरोग अधिकारी यांना स्थानिक पातळीवर खरेदी करण्याची परवानगी देण्यात आली होती. तसेच मुंबई जिल्हा क्षयरोग नियंत्रण सोसायटीमार्फत औषधांच्या उपलब्धतेप्रमाणे Cap. Clofazimine, Cap. Cycloserine, Tab Linezolid ची खरेदी करण्यात आली होती. तसेच इतर आवश्यक असणाऱ्या सर्व औषधांची आवश्यक प्रमाणात खरेदी करण्यात आलेली असून, सदर औषधांचा पुरेसा साठा उपलब्ध करण्यात आला होता.सद्य:स्थितीत क्षयरुग्णांना कोणतेही औषधे बाहेरून विकत घ्यावी लागत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.